महाराष्ट्र शासन
# समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-1

दूरध्वनी क्र. 20-26137186 ईमेल - Escholmapping@gmail.com

जा.क्र.सकआ/शिक्षण/डीबीटी-पत्रव्यवहार/का-४क/२५-२६/2708 दि.23/09/2025

**तात्काळ**

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादा**

प्रति,
सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग
सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

**विषय: केंद्र हिस्सा ६०% वितरणाकरिता प्रलंबित विद्यार्थ्यांचे आधार-बँक संलग्निकृत करणेबाबत..**
**संदर्भ :- आयुक्तालयाचे पत्र क्रमांक 343154 दि.25.07.2025**

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येत आहे की, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून केंद्र शासनामार्फत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा केंद्र हिस्सा (60%) (दुसरा हप्ता) NSP पोर्टलद्वारे वितरीत करण्यात येत आहे. याबाबतचा केंद्रहिस्सा 60% वितरण तपशील महाडीबीटी पोर्टलवर यापुर्वी उपलब्ध नसल्यामुळे महाविद्यालय व विद्यार्थ्यांकडून क्षेत्रिय कार्यालयास तक्रारी प्राप्त होत होत्या. त्यानुषंगाने केंद्रशासनामार्फत NSP प्रणालीद्वारे केंद्रहिस्सा 60% वितरीत झालेल्या रकमेचा विद्यार्थीनिहाय तपशील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध झालेला आहे. संबंधित माहिती महाविद्यालय लॉगिनमध्ये “Student Disbursement Report” या पर्यायाखाली जाऊन, “दुसरा हप्ता” निवडल्यास विद्यार्थीनिहाय वितरणाचा तपशील प्राप्त होऊ शकतो.

विद्यार्थ्यांच्या आधार-बँक सीडिंग अडचणीबाबत यापुर्वीच संदर्भीय पत्रान्वये सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून सर्व राज्य शासनांना कळविण्यात आले आहे की, त्यांच्या अधिनस्त असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे बँक खाते थेट आधार क्रमांकास संलग्न करण्यासाठी किंवा आधार-बँक सद्यस्थिती संबंधित अडचणींचे निराकरण करण्यासाठी https://www.npci.org.in/ वेबलिंकवरील Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE) प्रणालीचा वापर करून आधार बँक संलग्नताबाबतचे निराकरण खालीलप्रमाणे करावेत.

**https://www.npci.org.in/ ➡️ Consumer ➡️ Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE)**







- **आधार सीडिंग/डिसिडिंग (Aadhaar Seeding/Deseeding):** तुमचे आधार कार्ड बँक खात्याशी जोडण्यासाठी किंवा काढण्यासाठी.
- **आधार मॅप्ड स्टेटस (Aadhaar Mapped Status):** तुमचे आधार कार्ड बँक खात्याशी लिंक झाले आहे की नाही, हे तपासण्यासाठी.
- **आधार मॅपिंग हिस्ट्री (Aadhaar Mapping History):** तुमच्या आधार जोडणीच्या मागील नोंदी पाहण्यासाठी.
- **रिक्वेस्ट स्टेटस चेक (Request Status Check):** तुम्ही केलेल्या अर्जाची सध्याची स्थिती तपासण्यासाठी.

तथापि, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत सुमारे ४५ हजार विद्यार्थ्यांचे बँक खाते त्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न (linked) नसल्यामुळे, केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीद्वारे शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करण्यात अडचणी येत आहेत. या समस्येवर त्वरित तोडगा काढण्यासाठी, केंद्र शासनाने १७ सप्टेंबर २०२५ रोजी ई-मेलद्वारे PFMS प्रणालीद्वारे शिष्यवृत्ती न मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी राज्याला उपलब्ध करून दिली आहे.

या संदर्भात, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना लेखी सूचना निर्गमित करून, महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्याची प्रक्रिया [https://www.npci.org.in/](https://www.npci.org.in/) पोर्टलवरील Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE) प्रणालीद्वारे वरील सूचनांचा अवलंब करून विशेष मोहीम राबवून तातडीने पूर्ण करून घ्यावी.

तसेच, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील केंद्र हिस्सा ६०% वितरणासाठी प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचा डेटा QR कोड वर उपलब्ध आहे. यामध्ये विद्यार्थ्यांकडून [https://www.npci.org.in/](https://www.npci.org.in/) प्रणालीचा वापर करून आधार-बँक लिंक स्थिती पूर्ण करावी तदनंतर महाविद्यालय स्तरावर याची खातरजमा करून, त्यांचा डेटा त्वरित या QR कोडचा वापर करून जिल्हा व महाविद्यालय निवडावा. या डेटा लिंकचा वापर करण्याकरिता Pass@123 हा पासवर्ड टाकून महाविद्यालयनिहाय व विद्यार्थीनिहाय माहिती अद्यावत करावी. जेणेकरून सदर डेटा केंद्र शासनास फेरसादर करता येईल. यामुळे, आधार संलग्न नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया केंद्र शासनाकडून लवकरात लवकर सुरू होईल. केंद्र शासनास अद्यावत माहिती सादर करण्याची अंतिम दि.३०/०९/२०२५ असून त्यानंतरचा डेटा NSP पोर्टलवर स्वीकारला जाणार नाही याची नोंद गांभीर्याने घ्यावी.

**QR कोड गुगललेन्सद्वारे 🔍 स्कॅन करावा.**



Aadhaar Bank seeding Pending record

Logged in as: escholcommunication@gmail.com

Select District: NAGPUR | Select Institute: Select an Institute | Search: Search... | Done ✅ 0 | Due ⛔ 3464

Select up to 10 records to submit.

☑ 📌 This is to certify that the applicant has complied with the Aadhaar seeding requirements and his application should be sent for beneficiary creation process again. Are you sure to submit?

Submit

| ACTION | ID | DISTRICT NAME | INSTITUTE NAME | APPLICATION ID | STUDENT NAME | TOTAL AMOUNT | PAYMENT REJECTION REASON DESC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| KYC Pending | 9 | NAGPUR | Lokmanya Tilak Jankalyan Shikshan Sanstha, Priyadarshani College of Engineering, Nagpur | 2223SJS1002629565 | Mayur Anil Somkuwar | 74563 | Aadhar is either not seeded or inactive. |
| KYC Pending | 81 | NAGPUR | HISLOP COLLEGE, NAGPUR | 2223SJS1002035878 | Harshwardhan Milind Jadhav | 1938 | |
| KYC Pending | 87 | NAGPUR | Samridhi Sarwajanik Charitable Trust, Jhulelal Institute of Technology, Nagpur | 2223SJS1002593465 | Bhagyashri Harendra Bhagat | 52539 | Aadhar is either not seeded or inactive. |

तरी, या तिन्ही बाबींवर त्वरित कार्यवाही करून संबंधित महाविद्यालयांना योग्य त्या सूचना निर्गमित कराव्यात, तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही. याबाबत उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ आयुक्तालयास सादर करावा.

**(प्रमोद जाधव)**
सहआयुक्त (शिक्षण),
समाज कल्याण, आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य पुणे.

**प्रत:- कार्यवाही व माहितीस्तव**
**प्रकल्प व्यवस्थापक, महाडीबीटी तांत्रिक कक्ष महाआयटी मुंबई**

आपणास कळविण्यात येत आहे की, केंद्र हिस्सा ६०% वितरण तपशील सद्यस्थितीत “Student Disbursement Report” या पर्याय उपलब्ध असून सदर माहिती महाडीबीटी पोर्टलवरील सर्व अहवालामध्ये (DBT Dashboard, Application status wise Report, Student Login -Voucher Report,etc) यामध्ये समावेश करण्यात यावा. तसेच विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची प्रक्रिया [https://www.npci.org.in/](https://www.npci.org.in/) पोर्टलवरील Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE) वर नमूद केल्याप्रमाणे सूचना महाडीबीटी पोर्टलवरील होमपेजवर ठळकदृष्टया प्रसिद्ध करण्यात यावी.